# विशेष दिवाणी दावा क्र. ११३/२०२३

**CNRNOMHOS120003402023**

**ब्रम्हदेव वि. भागवत**

## नि.क्र. ३८ खालील आदेश

(आदेश दि.१२/०९/२०२५)

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांच्या विरुध्द दिनांक २०.०३.२०२५ रोजी नि.क्र.१ वर झालेला विना म्हणणे आदेश रद्य करुन मिळणेसाठी दिलेला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे प्रस्तुत प्रतिवादी यांनी जाणुन-बुजुन म्हणणे देण्यासाठी उशीर केलेला नाही. प्रस्तुत वादीने प्रतिवादींच्या विरुध्द एकाच कारणावरुन फौजदारी व दिवाणी दावे दाखल केले होते. त्यामुळे प्रतिवादींनी प्रस्तुत प्रकरण स्थगीतीचा अर्ज दिला होता परंतु तो नामंजुर झाला. त्यामुळे या प्रकरणात प्रतिवादींना वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. सबब, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादीने म्हणणे दाखल केले आहे की, सदरचा अर्ज खोटा व काल्पनीक आहे. प्रस्तुत प्रतिवदी यांना बजावणी दिनांक २१.०९.२०२३ रोजी झालेली असून ते स्वत:हुन दिनांक १६.१२.२०२३ रोजी प्रकरणात हजर झालेले आहे. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादींच्या व वादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रकरणात प्रतिवादींनी कैफियत दाखल न केल्यामुळे त्यांच्या विरुध्द दिनांक २०.०३.२०२५ रोजी निशाणी क्र. १ वर विना कैफियतीचा आदेश पारीत करण्यात आला आहे. अभिलेखावरुन प्रतिवादींचे म्हणणे की, त्यांनी पुर्वी प्रस्तुत प्रकरण स्थगीतीचा अर्ज दिला होता व तो नामंजुर झाला याला पुष्ठी मिळते. अर्जातील कारण संयुक्तीक व

रास्त वाटते. प्रकरणाचा निकाल गुणदोषावर लावण्यासाठी प्रस्तुतचा दिलेला अर्ज हा मंजुर करणे न्यायोचित ठरणार आहे. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. निशाणी क्र.३८ खालील अर्ज प्रतिवादींनी एकत्रीत वादीस रु. ५००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत अर्जदार यांनी सोसण्याचा आहे.

RAHUL DATTATRAY DANGE

Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2025.09.12 17:38:15 +0530

दिनांक – १२/०९/२०२५

(राहुल द. डांगे)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom, District - Osmanabad. |
| Date | --- | 12/09/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 12/09/2025 |
| Order uploaded on | --- | 12/09/2025 |